# बृहन्मुंबई महानगरपालिका
## ज्ञाप परिपत्रक
## 2019-20

**क्र. साप्रवि/एफजीआर/01 अ / म.भ. दिनांक 11.09.2019**

विषय : सातव्या वेतन आयोगानुसार महानगरपालिका निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या महागाई सहाय्य दर सुधारित करण्याबाबत.

संदर्भ :1)केंद्र शासन कार्यालयीन ज्ञापन क्र.1/1/2019-E-II (B)दि.27.02.2019

2) शासन निर्णय क्र.निमवा / 2019 /प्र.क.313/ सेवा-4 दि.15.07.2019

महानगरपालिका निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सद्यस्थितीत 142% प्रमाणे महागाई सहाय्य देण्यात येत आहे.

राज्य शासनाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये दि.01.01.2016 पासून वेतन सुधारणा केली असून सुधारीत वेतन संरचनेतील वेतनावर खाली नमूद केलेल्या सुधारीत दराने महागाई सहाय्य मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत.

| अ.क्र. | प्रभाव्य दिनांक | महागाई भत्ता सुधारीत दर |
|---|---|---|
| 1 | दि.01.01.2016 | 0% |
| 2 | दि.01.07.2016 | 2% |
| 3 | दि.01.01.2017 | 4% (2% वरुन 4%) |
| 4 | दि.01.07.2017 | 5% (4% वरुन 5%) |
| 5 | दि.01.01.2018 | 7% (5% वरुन 7%) |
| 6 | दि.01.07.2018 | 9% (7% वरुन 9%) |

त्यानुसार महानगरपालिका निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि.01.01.2016 पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित मुळ वेतनावर वर नमूद दराने सुधारित महागाई सहाय्य अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र.निमवा/2019/प्र.क.313/सेवा-4 दि.15.07.2019 रोजीच्या शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना 9% वरुन 12% असा महागाई सहाय्याचे दर वाढवून देण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनेत महानगरपालिकेतील निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनाच्या महागाई सहाय्य दरामध्ये दि.01.01.2019 पासून 3% दराने वाढ करुन म्हणजेच 9% वरुन 12% वाढ करण्यास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सूचना-

1) माहे सप्टेंबर 2019 मध्ये सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीतील मुळ निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनावरील महागाई सहाय्य 9 टक्के वरुन 12 टक्के दराने आकारण्यात यावे.

2) जानेवारी 2019 ते ऑगस्ट 2019 या महिन्यासाठी महागाई सहाय्याची थकबाकी माहे सप्टेंबर 2019 च्या निवृत्तिवेतनाबरोबर आकारावयाची आहे. याबाबत आधार सामग्री संस्करण विभाग / मानव संसाधन विभागास (HR Module) स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे.

3) महागाई सहाय्याची रक्कम परिगणित करतांना 50 पैसे किंवा त्याहून अधिक येणारी रक्कम पुढील रुपयात पूर्णांकित करावी व 50 पैशापेक्षा कमी येणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

सर्व खाते प्रमुख आणि सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, या ज्ञाप परिपत्रकाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित आस्थापना कर्मचा-यांना दयावेत.

सदर परिपत्रकाची प्रत महापालिकेच्या Intranet वर ftp://45.249.109.226./ Circulars /GAD / Dy C.A.Estt II/FGR या साईटवर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.21.08.2019 | सही/-दि.23.08.2019 | सही/-दि.30.08.2019 |
| श्री.अशोक रुपवते | श्रीम.सुलोचना कवडे | श्री.प्रदिप पडवळ |
| उप प्रमुख लेखापाल (आस्था-2) | प्रमुख लेखापाल (कोषागार) | प्रमुख लेखापाल (वित्त)प्र. |

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.31.08.2019 | सही/-दि.03.09.2019 | सही/-दि.04.09.2019 |
| श्री.मिलिन सावंत | श्री.ए.एल.ज-हाड | श्री.प्रविण दराडे |
| सह आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) | अति.आयुक्त (प्रकल्प) |